• वर्ष : ०३ • अंक : २१६ • पुणे • सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





निवृत्तीनंतरच्या जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची गरज 3




ASUS कडून 'एक्स्पर्टबुक अल्ट्रा' सादर 4

## ठळक बातम्या

### कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची रॅगिंग

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहरातील नामांकित आयएलएस विधी महाविद्यालयाच्या मुलांच्या वसतिगृहात रॅगिंगचा प्रकार उघडकीस आला असून या घटनेमुळे शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी डेक्कन पोलिसांनी 'एलएलबी'च्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या पाच विद्यार्थ्यांविरुद्ध महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी हा ३५ वर्षीय विद्यार्थी असून तो आयएलएस लॉ कॉलेजमध्ये 'एलएलबी'च्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. तो महाविद्यालयाच्या रस्त्यावरील मुलांच्या वसतिगृहात राहतो. त्याच वसतिगृहात राहणाऱ्या इतर पाच विद्यार्थ्यांनी त्याच्याशी गैरवर्तन करत शिवीगाळ केली तसेच मानसिक त्रास देत रॅगिंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. पीडित विद्यार्थ्याने काही महिन्यांपूर्वी डेक्कन पोलिस ठाण्यात लेखी अर्ज देऊन तक्रार नोंदवली होती.

### विमानात बिघाड; एमर्जन्सी लँडिग

मुंबई (आरंभ पर्व) : मध्य प्रदेशच्या राजधानी भोपाळमधून मोठी बातमी हाती आली आहे. मुंबईहून निघालेल्या एअर इंडियाच्या प्लाइट AI63 मध्ये संशयास्पद तांत्रिक बिघाडानंतर विमानाचं एमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं आहे. विमान सुरक्षितरित्या भोपाळच्या विमानतळावर लँडिंग करण्यात आलं आहे. विमानात एकूण १७५ जण होते. यात १६६ प्रवाशांचा समावेश आहे. तर ९ क्रू मेंबर आहेत. विमानातील सर्व प्रवासी सुरक्षित असून त्यांना तातडीने बाहेर काढण्यात आलं. मुंबईतून विमानाने उड्डाण केल्यानंतर काही वेळात तांत्रिक बिघाड झाला. सध्या परिस्थिती पुन्हा नियंत्रणात आहे. एअर इंडियाच्या माहितीनुसार, विमानात तांत्रिक बिघाड झाल्याचे संकेत मिळाल्यानंतर पायलटने तातडीने SOP अंतर्गत निर्णय घेतला. याच वेळेत मोठा अपघात टाळण्याचा अवधी असतो. यासाठी पायलट आणि ट्रॅफिक कंट्रोलसोबत समन्वय असणे गरजेचे असते. पायलटच्या निर्णयामुळे १७५ जण सुरक्षित असून मोठी दुर्घटना टळली आहे.

### मरीन ड्राईव्हवर पहाटे भीषण अपघात

मुंबई (आरंभ पर्व) : मुंबईतील मरीन ड्राइव्हवर आज सोमवारी पहाटे भीषण अपघाताची घटना घडली आहे. मरीन ड्राइव्ह परिसरात तीन दुचाकींचा अपघात झाला. गिरगाव चौपाटीजवळ हा भीषण अपघात झालाय. या भीषण दुर्घटनेत ज्येष्ठ नागरिकासह तरुण आणि तरुणीचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तपास सुरू केला आहे. मुंबईतील मरीन ड्राइव्हवर आज सोमवारी पहाटे भीषण अपघाताची घटना घडली आहे.

# मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील घाटाला मिळणार बायपास

## 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे १ मेला उद्घाटन : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली मिसिंग लिंकच्या कामाची पाहणी

- घाटातील अपघात आणि विलंबाला कायमचा ब्रेक; वेगवान आणि सुरक्षित प्रवासाने अर्थव्यवस्थेला मिळणार गती
- नवीन टोलवाढ नाही, चारचाकी आणि बसेस मधून होणाऱ्या प्रवासी वाहतुकीला परवानगी







**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः 'ॲक्सेस कंट्रोल' बनवणाऱ्या महत्त्वाच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. "मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत," असे त्यांनी सांगितले.

सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. "या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील," असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे.

या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बस आणि हलक्या वाहनांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल.

टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, "मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही."

सुमारे ६७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले.

## बिर्याणीनंतर कलिंगड खाणं बेतलं जीवावर, ४ जणांचा मृत्यू



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दक्षिण मुंबईतील पायधुनी परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. अन्नातून झालेल्या विषबाधेमुळे (Food Poisoning) एकाच कुटुंबातील चार सदस्यांचा मृत्यू झाला आहे. बिर्याणी खाल्यानंतर या कुटुंबाने कलिंगड खाल्लं होतं, जे त्यांच्या जीवावर बेतल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मुंबई पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पायधुनी परिसरात राहणाऱ्या या कुटुंबाची प्रकृती अचानक खालावली होती. मृत्यूपूर्वी कुटुंबातील एका व्यक्तीने पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार, त्यांनी रात्रीच्या जेवणात आधी बिर्याणी खाल्ली होती आणि त्यानंतर काही वेळातच कलिंगडाचे सेवन केलं होतं. हे पदार्थ खाल्ल्यानंतर कुटुंबातील सदस्यांना उलट्या आणि मळमळीचा त्रास सुरू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पंचनामा केला असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवले आहेत. अन्नातून विषबाधा नेमकी कशामुळे झाली, याचा तपास आता पोलीस करत आहेत. बिर्याणी आणि कलिंगड यांचे मिश्रण घातक ठरले की त्यापैकी एखादा पदार्थ आधीच खराब झाला होता, याबाबतचा अहवाल फॉरेन्सिक लॅबकडून आल्यानंतरच नेमके कारण स्पष्ट होणार आहे. एकाच घरातील चौघांचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने पायधुनी परिसरात शोककळा पसरली आहे.

# पुणे आणि परिसरातही उष्णतेच्या झळा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विदर्भात उष्णतेची लाट असताना पुणे आणि परिसरातही उष्णतेच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. पुणे आणि परिसरात उष्णतेच्या लाटेसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. रविवारी कोरेगाव पार्क येथे सर्वाधिक ४२.९ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली असून, त्या खालोखाल लोहगाव येथे ४२.७ अंश सेल्सियस नोंदवले गेले. पुढील दोन ते तीन दिवस तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामानतज्ज्ञांनी वर्तवला आहे. गेल्या काही दिवसांपासून पुणे शहर आणि परिसरात तीव्र उष्ण वातावरण आहे. शहरात लोहगावसारख्या भागातील कमाल तापमान सातत्याने ४० अंश सेल्सियसपेक्षा अधिक राहिले आहे. तर, शिवाजीनगर येथेही सातत्याने तापमान ४० अंश सेल्सियसच्या आसपास आहे. ४० अंश सेल्सियसपेक्षा जास्त तापमानाची पाच वेळा नोंद झाली आहे, तर १२ दिवसांपेक्षा जास्त वेळा ३९ अंश सेल्सियसपेक्षा जास्त तापमान नोंदवले गेले आहे. या पार्श्वभूमीवर, रविवारी कमाल तापमानाचा पारा शिवाजीनगर येथे ४१.८ अंश सेल्सियसवर पोहोचला. तर लोहगाव येथे ४२.७, चिंचवड येथे ४१.२, लवळे येथे ४०.५, मगरपट्टा येथे ४०.९, कोरेगाव पार्क येथे ४२.९, एनडीए येथे ३९.३ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. या पूर्वी २०२२ आणि २०२४मध्ये एप्रिलमध्ये शिवाजीनगर येथे ४१.८ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले होते. तर २०२५मध्ये एप्रिलमध्येच ४१.३ अंश सेल्सियस तापमान होते. तापमानात होत असलेली वाढ, उष्म्यामुळे पुणेकर हैराण झाले आहेत. सकाळी नऊ-दहा वाजल्यापासून उन्हाची तीव्रता जाणवत आहे. सायंकाळपर्यंत उन्हाच्या झळा बसत आहेत. रात्रीच्या तापमानातही फार घट होत नसल्याने रात्रीही उकाडा, उष्मा सहन करावा लागत आहे.

> तांत्रिकदृष्ट्या पुण्यात उष्णतेची लाट नाही, पण प्रभावाच्या दृष्टीने उष्णतेच्या लाटेसारखीच स्थिती आहे. येत्या तीन ते चार दिवसांत पुण्यात पावसाची शक्यता कमी आहे. दिवसाचे तापमान पुण्यासह राज्यात काही प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वांनी सकाळी अकरा ते दुपारी चार या वेळेत बाहेर पडणे टाळावे, तब्येतीची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.
>
> **– अनुपम कश्यपी, ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ**

# सिद्धेश्वर एक्सप्रेसवर दरोडा

## RPF ने उधळवला डाव, ९ महिलांना बेड्या



**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

सोलापूरला जाणाऱ्या सिद्धेश्वर एक्सप्रेसवर दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या ९ महिलांना आरपीएफने बेड्या ठोकल्या आहेत. बुधवारी सायंकाळी जेऊर स्थानकावर ९ महिलांनी दरोडा टाकण्याचा प्लान आखला होता. पण कुर्डूवाडीमधील आरपीएफने हा डाव हाणून पाडला. त्यानंतर सोलापूर पथकाला संपूर्ण मार्गावर हाय अलर्ट जारी करण्याची माहिती देण्यात आली. बुधवारी कुर्डुवाडी स्थानकावर कर्तव्यावर असलेल्या गुन्हे प्रतिबंध व शोध पथकाचे हेड कॉन्स्टेबल शिवाजी मुंडे यांना ३ महिला संशयास्पद रीतीने फिरताना दिसल्या. या महिलांना त्यांच्या ठावठिकाण्याबद्दल विचारपूस करण्यात आली आणि स्थानक सोडून जाण्याचा इशारा देऊन सोडून देण्यात आले. या महिला गाडी क्रमांक 22108 लातूर एक्सप्रेसमध्ये चढताना दिसल्या आणि त्यानंतर सोलापूर पथकाला संपूर्ण मार्गावर हाय अलर्ट जारी करण्याची माहिती देण्यात आली. आरोपी जेऊर स्थानकावर उतरल्या, जिथून त्या दरोडा टाकण्याच्या उद्देशाने गाडी क्रमांक 12115 सिद्धेश्वर एक्सप्रेसमध्ये चढल्या. आरपीएफचे पथक आधीच कामावर होते आणि सिद्धेश्वर एक्सप्रेसच्या एस्कॉर्टिंग टीमला, म्हणजेच हेड कॉन्स्टेबल हरमेंद्र प्रसाद मीना आणि कॉन्स्टेबल ब्रजेश यादव यांना संदेश देत होते. तसेच छायाचित्रे प्रवासी इत्यादींच्या मदतीने संशयितांवर सतत पाळत ठेवत होते. लेडी कॉन्स्टेबल सोनम पठाण यांच्यासह आरपीएफ कर्मचाऱ्यांचे एक पथक सोलापूर स्टेशनवर तयार होते, जिथे सर्व ९ आरोपी महिला गुन्हेगारांना ताब्यात घेण्यात आले. १८ ते ४० वर्षे वयोगटातील या संशयित महिला धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी आहेत. आरोपींना जीआरपी/कुर्डूवाडीच्या ताब्यात देण्यात आले आणि भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३१०(४) (दरोड्याची तयारी) अंतर्गत गुन्हा क्र. २६/२०२६ द्वारे गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या टोळीबाबतची संबंधित माहिती पुणे विभागाला कळवण्यात आली. कारण ते सोलापूर आणि पुणे या दोन्ही विभागांमध्ये कार्यरत असल्याचे समोर आले आहे. प्रवाशांना सतर्क राहण्याचा आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास रेल्वे अधिकाऱ्यांना कळवण्याचा किंवा मदतीसाठी १३९ डायल करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### दौंड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्षपदी हर्षदा वूड यांची निवड

दौंड (आरंभ पर्व) : दौंड शहरातील उच्चशिक्षित हर्षदा विकी वूड यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दौंड शहर कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र पुणे जिल्हा अध्यक्षा मोनिका नवनाथ हरगुडे यांच्या आदेशानुसार त्यांना प्रदान करण्यात आले. निवडीनंतर बोलताना हर्षदा वूड यांनी सांगितले की, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे तसेच माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दौंड शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविणे, विकासकामांना गती देणे आणि पक्षवृद्धीसाठी प्रयत्न करणार आहेत. नियुक्तीपत्र प्रदान करताना माजी आमदार रमेश आप्पा थोरात, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, वैशाली नागवडे, नंदू पवार, नगराध्यक्षा दुर्गादेवी जगदाळे तसेच जिल्हा परिषद सदस्य तुषार थोरात आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी हर्षदा वूड यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



### व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी वाचन आवश्यक - मंगेश गुंडाळ

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : विद्यार्थ्यांमध्ये मोबाईल आणि सोशलमीडियाच्या प्रभावामुळे वाचनाची आवड कमी होत चालली आहे. वाचनाने आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. त्यामुळे व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन आवश्यक असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित वाचकवीर पुरस्कार वितरण कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. गणेश धुमाळ, प्रा. अपर्णा कुलकर्णी, प्रबंधक नारायण शिंदे उपस्थित होते. नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या हस्ते शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा वाचकवीर पुरस्कार एम.ए. ची विद्यार्थिनी सीमा शेलार यांना देण्यात आला. चार हजार रूपयांची पुस्तके, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. पुरस्कारप्राप्त सीमा शेलार यांचे कौतुक करून नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी वाचकवीर पुरस्कारामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड रूजण्यास मदत होऊन वाचनाची चळवळ निर्माण होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी वाचनामुळे अनुभवविश्व व्यापक होऊन जाणिवा समृद्ध होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रूजवण्याची गरज असून वाचनसंस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी मराठी विभाग करीत असलेल्या प्रयत्नाबद्दल आनंद व्यक्त केला. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी वाचनामुळे विचारांची प्रगल्भता येते असे सांगितले. सीमा शेलार यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करून वाचकवीर उपक्रमामुळे वाचनाची आवड आणखी दृढ झाल्याचे सांगितले. प्रास्ताविकात डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी अधिकाधिक अवांतर पुस्तके वाचावीत यासाठी त्यांना प्रोत्साहन म्हणून वाचकवीर पुरस्कार देण्यात येत असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

### वारकरी आणि धारकरी दोन्ही गरजेचे; अविनाश धर्माधिकारी यांचे मत

पुणे (आरंभ पर्व) : 'संस्कृती टिकवण्यासाठी वारकरी आणि प्रसंगी तलवार उचलणारा धारकरी दोन्हीही गरजेचे आहे,' अशा शब्दांत अविनाश धर्माधिकारी यांनी वारकरी-धारकरी वादावर भाष्य केले.लोणावळ्यातील मन:शक्ती प्रयोग केंद्राच्या वतीने आयोजित मन:शक्ती सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात अविनाश धर्माधिकारी बोलत होते. महापौर मंजूषा नागपुरे, मूर्तिशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर, चाणक्य मंडल परिवारचे संचालक अविनाश धर्माधिकारी, ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर, संस्थेचे विश्वस्त प्रमोद शिंदे, गजानन केळकर आणि नितीन राजणेकर उपस्थित होते. याच कार्यक्रमात सन्मान सत्कृत्याचा उपक्रमांतर्गत दुवा केंद्र फाउंडेशन आणि सोलापूर येथील भैरवनाथ प्रशाला या संस्थांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अनिरूद्ध दडके यांनी सूत्रसंचालन केले. केळकर यांनी आभार मानले. 'वारकरी संप्रदायात अतिशय साध्या अटी, साधे नियम आहेत. अभद्र वर्तन करायचे नाही. तुळशीची माळ गळ्यात ठेवायची, एकादशीचे व्रत करायचे, नित्य हरिपाठ वाचायचा, इतके सोपे नियम आहेत. कुलदैवत, कुलदेवता कोणीही असली तरीही, वारकरी म्हणून देव एकच. तो म्हणजे विठ्ठल. वारकरी संप्रदायात भक्तीचा भाव मुख्य आहे,' असे मत मूर्तिशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले.

### आता सकाळी ७ ते ११ बत्तीगुल?

पुणे (आरंभ पर्व) : उन्हाच्या तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीची पूर्वनियोजित कामे त्या-त्या दिवशी सकाळीच सात ते ११ वाजताच्या दरम्यान करण्याचा निर्णय महावितरणकडून घेण्यात आला आहे. आता देखभाल-दुरूस्तीसाठी फक्त सकाळी सात ते ११ वाजेदरम्यानच वीजपुरवठा खंडीत करण्यात येणार आहे. उन्हाळ्यातील विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेची देखभाल-दुरुस्ती करण्यात येते. या कामांचे नियोजन पावसाळ्यापूर्वीच केले जाते. देखभाल-दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या अखेरीस पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असते. त्यानुसार सध्या सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल आणि दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत. या कालावधीत वीजपुरवठा बंद करण्यात येत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन कामांवर परिणाम होत असून, मोठी गैरसौय होत असल्याच्या तक्रारी करण्यात येत होत्या.

# 'सीएमए' विद्यार्थी व सदस्यांसाठी स्वतंत्र 'हेल्पडेस्क'ची सुविधा

## सीएमए टीसीए श्रीनिवासा प्रसाद यांची माहिती; 'आयसीएमएआय'तर्फे केंद्रीय व विभागीय पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"कॉस्ट अँड मॅनेजमेंट (सीएमए) क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी असून, विद्यार्थ्यांचा या अभ्यासक्रमाकडे कल वाढला आहे. दिवसेंदिवस सीएमए करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या व सदस्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी संस्थेच्या वतीने स्वतंत्र हेल्पडेस्कची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याबरोबरच प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता व सुलभता आणली जात आहे," अशी माहिती दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे (आयसीएमएआय) राष्ट्रीय अध्यक्ष सीएमए टीसीए श्रीनिवासा प्रसाद यांनी केले. सीएमए व्यवसायाच्या सक्षमीकरणासाठी संस्थेचे नेतृत्व आणि सदस्य यांच्यातील सातत्यपूर्ण संवाद, ज्ञानविनिमय



आणि कौशल्यवृद्धी महत्त्वाची ठरते, असेही त्यांनी नमूद केले. दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएमएआय) पुणे चॅप्टरच्या वतीने केंद्रीय व विभागीय समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या सत्कार व संवाद सोहळ्यात श्रीनिवासा प्रसाद बोलत होते. कर्वेनगर येथील सीएमए भवनात झालेल्या कार्यक्रमावेळी 'आयसीएमएआय'चे राष्ट्रीय उपाध्यक्ष सीएमए नीरज जोशी, केंद्रीय समिती सदस्य सीएमए नवनीत जैन, सीएमए आशिष थत्ते, पश्चिम विभागीय समितीचे सचिव सीएमए चैतन्य मोहरीर, उपाध्यक्ष सीएमए नॅन्टी शाह, पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए श्रीकांत ईप्पलपल्ली, उपाध्यक्ष सीएमए राहुल चिंचोळकर, सचिव सीएमए हिमांशू दवे, खजिनदार सीएमए तनुजा मंत्रवादी, 'आयसीएमएआय'चे माजी अध्यक्ष सीएमए डॉ. धनंजय जोशी, पुणे चॅप्टरचे सल्लागार सीएमए डॉ. संजय भार्गवे यांच्यासह सीएमए सदस्य उपस्थित होते. सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली यांनी स्वागत-प्रास्ताविकात चॅप्टरतर्फे राबविण्यात आलेल्या विविध व्यावसायिक आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची माहिती दिली. सेमिनार, कार्यशाळा आणि विद्यार्थी विकास कार्यक्रमांमुळे संस्थेची, तसेच पुणे चॅप्टरची प्रतिमा आणि ओळख अधिक बळकट झाली आहे. हीरक महोत्सवी वर्षात संस्थेने सदस्य व विद्यार्थ्यांसाठी राबविलेले उपक्रम महत्वपूर्ण ठरले असून, हा प्रवास अभिमानास्पद आहे.

सीएमए नीरज जोशी यांनी 'आयसीएमएआय'चे मुख्यालय कोलकाता येथून दिल्ली येथे स्थलांतरित झाल्यानंतर संस्थेच्या कामकाजाच्या गतीत झालेल्या वाढीबाबत माहिती दिली. यामुळे शासकीय कार्यालयांशी तातडीने संपर्क साधणे अधिक सुलभ झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. हे सत्र सदस्यांना संस्थेच्या नेतृत्वाशी संवाद साधण्यासाठी, भावी दिशा समजून घेण्यासाठी आणि सीएमए व्यवसायाच्या प्रगतीसाठी आपली बांधिलकी अधिक दृढ करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. सीएमए आशिष थत्ते यांनी श्रीनिवासा प्रसाद व नीरज जोशी यांच्या कुशल व सक्षम नेतृत्वामुळे प्रशासकीय नियंत्रण अधिक प्रभावी झाले असून, कार्यक्षेत्रात नव्या संधींचा शोध घेण्यासाठी अधिक स्वातंत्र्य मिळाल्याचे सांगितले. सीएमए नवनीत जैन यांनी सहकारी क्षेत्रातील अलीकडील घडामोडींविषयी तसेच सहकारी बँकिंग क्षेत्रातील अद्ययावत माहिती दिली. तसेच या क्षेत्रात सीएमए व्यावसायिकांची वाढती भूमिका अधोरेखित केली. सीएमए चैतन्य मोहरीर आणि सीएमए नॅन्टी शाह यांनी वेस्टर्न इंडिया रीजनल कौन्सिलच्या उपक्रमांची माहिती दिली.

> या संवाद सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तरे झाली. केंद्रीय व विभागीय पदाधिकाऱ्यांनी सीएमए सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे व शंकाचे समाधानकारक निरसन केले. सीएमए तनुजा मंत्रवादी यांनी सूत्रसंचालन केले. सीएमए हिमांशू दवे यांनी आभार मानले. तत्पूर्वी, एआय ट्रेनर सीएमए देवदत्त केकतपुरे यांचे 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर व्याख्यान झाले.

## वर्टिकल A आणि C व्यवसायांच्या डिमर्जरला तत्त्वतः मंजुरी

**कोलकाता/इंदौर (दै. आरंभ पर्व)**

Lux Industries Limited ने आपल्या व्यवसाय संरचनेत मोठा बदल करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत वर्टिकल A आणि वर्टिकल C व्यवसायांच्या डिमर्जरला तत्त्वतः मंजुरी दिली आहे. हा निर्णय 23 एप्रिल 2026 रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. हा निर्णय प्रवर्तक गटातील सदस्यांमध्ये झालेल्या फॅमिली सेटलमेंट कराराच्या (FSA) पार्श्वभूमीवर घेण्यात आला आहे. यापूर्वी 22 नोव्हेंबर 2023 रोजी कंपनीने आपल्या व्यवसायाचे वर्टिकल A, B आणि C अशा तीन विभागांमध्ये विभाजन करण्यास मंजुरी दिली होती. नव्या प्रस्तावानुसार वर्टिकल A आणि वर्टिकल C या दोन विभागांचे विभाजन करून स्वतंत्र पूर्णतः मालकीच्या सहाय्यक कंपन्या स्थापन केल्या जातील आणि त्यांची नंतर सूचीबद्धता केली जाईल. तर वर्टिकल B हा व्यवसाय Lux Industries Limited अंतर्गतच सुरू राहणार आहे. कंपनीच्या मते, या पुनर्रचनेमुळे व्यवसाय संरचना अधिक सुसूत्र होईल, प्रत्येक वर्टिकलला स्पष्ट धोरणात्मक दिशा मिळेल आणि भागधारकांसाठी दीर्घकालीन मूल्यनिर्मिती होईल. हा निर्णय फॅमिली सेटलमेंट कराराशी सुसंगत असून, व्यवसाय, मालमत्ता आणि व्यवस्थापन यांचे स्पष्ट विभाजन करून दीर्घकालीन समन्वय राखण्याचा उद्देश आहे. प्रस्तावित रचनेनुसार वर्टिकल A मध्ये Lux Cozi, Lux Parker, ONN आणि Lux Cottswool हे प्रमुख ब्रँड्स समाविष्ट असतील, ज्यांची उत्पादन केंद्रे पश्चिम बंगाल, पंजाब आणि तमिळनाडू येथे आहेत.

## खेड तालुक्याच्या प्रत्येक कामासाठी सातत्याने पाठपुरावा करुन निधी आणला - आमदार बाबाजी काळे

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

मी विरोधी पक्षातला आमदार असलो तरी तालुक्याच्या विकासासाठी कोणत्याही मंत्र्यांच्या दारात जाईन. माझे पद घटनात्मक आहे आणि मी शिवसेना (उबाठा) पक्षाशी एकनिष्ठ आहे. तालुक्यातील विकासकामे आणि चाकण येथील अप्पर तहसील कार्यालय यावरून माझ्याबाबतीत तालुक्यात जे नकारात्मक वातावरण तयार करण्याचा प्रकार सुरू आहे तो धांदात खोटा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) माजी आमदार दिलीप मोहिते-पाटील यांचा हा प्रयत्न खोटारडा आहे. आमदार असतानाची त्यांची कृष्णकृत्य त्यांना आता भोगावी लागतील. अशी टीका खेडचे शिवसेनेचे आमदार बाबाजी काळे



राजगुरुनगर येथील सर्वपक्षीय पत्रकार परिषदेत बोलताना आमदार बाबाजी काळे व इतर मान्यवर. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर)

यांनी केली. खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात आयोजित सर्वपक्षीय पत्रकार परिषदेत ते बोलत होते. तालुक्यातील पाणी योजना, रस्ते, चाकणच्या नियोजित रस्त्यांचा निधी, चासकमान धरणातील बुडीत बंधारे अशा प्रत्येक कामासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला असून, त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. अनेक तारांकीत प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याचे पुरावे, बैठकीचे इतिवृत्त आणि फोटो आपल्याकडे असल्याचे आमदार काळे यांनी स्पष्ट केले. माझ्या ज्ञानावर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी आधी १५ वर्षे सत्तेत असताना स्वतःचं काम दाखवावं, असा टोलाही त्यांनी लगावला.

यावेळी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजमाला बुट्टे पाटील, जिल्हा परिषदेचे गटनेते आणि बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, संचालक अशोक राक्षे, अनुराग जैद, जिल्हा परिषद सदस्या तनुजा घनवट, दीप्ती भोगाडे, विनया मुंगसे, गणेश आरगडे, पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, शिवाजी वर्पे, पक्षाचे तालुका प्रमुख आणि राजगुरुनगर सहकारी बँकेचे उपाध्यक्ष रामदास धनवटे, संत तुकाराम साखर कारखान्याच्या संचालक ज्योती आरगडे, एल. बी. तनपुरे आदी यावेळी उपस्थित होते.

## डॉ. मणीभाई देसाई यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य तपासणी

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

डॉ. मणीभाई देसाई यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त डॉ. मणीभाई देसाई पतसंस्थेच्या वतीने रक्तदान शिबिर तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात येणार आहे.

या उपक्रमात महिला आरोग्य तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, हृदयाच्या ठोक्यांची नोंद, हाडांची ठिसूळता तपासणी, रक्तदाब मोजणी, स्थूलतेचे प्रमाण मोजणी, मधुमेह तपासणी आदी सुविधा उपलब्ध



असणार आहेत. तसेच डॉ. बुरगुटे नेत्रालयाच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व पतसंस्थेमार्फत गरजूंना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहे. या शिबिराचे उद्घाटन पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वराज रुग्णालयाचे प्रमुख अधिकारी डॉ. आशिषकुमार दोषी असणार आहेत, अशी माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कांचन यांनी दिली. यावेळी माजी सरपंच ज्ञानोबा कांचन, पुणे जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाचे सभापती जितेंद्र बडेकर, सरपंच मिलिंद जगताप, पंचायत समिती सदस्या कोमल कांबळे तसेच पतसंस्थेचे संचालक, सभासद, खातेदार, सल्लागार व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती उपाध्यक्ष रामदास चौधरी यांनी दिली.

## हवालदाराला धक्काबुक्की प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कारवाई करणाऱ्या पोलीस हवालदाराला धक्काबुक्की केल्याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांकडून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पाषाण येथील संजय गांधी वसाहतीत ही घटना घडली. याप्रकरणी एका महिलेसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखलां करण्यात आला आहे.याबाबत पोलीस हवालदार शरद होनमाने यांनी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या मााहितीनुसार, पोलीस हवालदार होनमाने आणि सहकारी हे २४ एप्रिल रोजी संजय गांधी वसाहत परिसरात रात्री अकराच्या सुमारास गस्त घातल होते. त्या वेळी वसाहतीत वाद सुरू होता. पोलीस हवालदार आणि सहकारी कायदेशीर कारवाई करण्याच्या तयारीत होते. त्या वेळी आरोपींनी त्यांना धक्काबुक्की केली. शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक येळे तपास करत आहेत.

## AIच्या युगात रोजगाराचा प्रश्न गंभीर आव्हान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशात आणि जगभरात वेगाने वाढत असलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि ऑटोमेशन तंत्रज्ञानामुळे लाखो लोकांच्या रोजगारावर होत असलेल्या परिणामाबाबत अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (AMCCIE) यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

चेंबरचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, तांत्रिक प्रगती अपरिहार्य आहे, मात्र त्यातून निर्माण होणारा रोजगारातील असमतोल हा एक मोठा सामाजिक व आर्थिक प्रश्न बनत चालला आहे।

ते म्हणाले, "AI आणि नवीन तंत्रज्ञानामुळे पारंपरिक नोकऱ्यांमध्ये घट होत असून मोठ्या प्रमाणावर लोक प्रभावित होत आहेत. हा विषय केवळ आर्थिक नसून सामाजिक स्थैर्याशीही संबंधित आहे."

मात्र त्यांनी हेही स्पष्ट केले की प्रत्येक तांत्रिक बदलासोबत नवीन संधीही निर्माण होत असतात. "AI रोजगार संपवत नाही, तर रोजगाराचे स्वरूप बदलते. त्यामुळे आपल्या कार्यबलाला री-स्किलिंग आणि अप-स्किलिंग द्वारे भविष्याकरिता तयार करणे आवश्यक आहे," असे त्यांनी नमूद केले. राजेश अग्रवाल यांनी उद्योग, सरकार आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मजबूत समन्वयाची



- सरकारच्या सक्रिय धोरणांची गरज अत्यावश्यक – राजेश अग्रवाल

गरज अधोरेखित करत सांगितले की, दीर्घकालीन धोरणांतर्गत युवक व कामगारांना नव्या तंत्रज्ञानानुसार प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. MSME क्षेत्रानेही डिजिटल व AI तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे ही काळाची गरज असून, यामुळे नवीन रोजगारनिर्मिती होऊ शकते.

त्यांनी विशेषतः भारत सरकार आणि राज्य सरकारांना आवाहन केले की या दिशेने ठोस व प्रभावी पावले उचलावीत – मोठ्या प्रमाणावर स्किल डेव्हलपमेंट आणि री-स्किलिंग मिशन राबविण्यात यावेत AI व डिजिटल तंत्रज्ञानासाठी विशेष प्रशिक्षण संस्था आणि कार्यक्रम सुरू करण्यात यावेत

MSME आणि स्टार्टअप्सना आर्थिक मदत, कर सवलती आणि तांत्रिक सहाय्य देण्यात यावे रोजगार गमावलेल्या व्यक्तींसाठी ट्रांजिशन सपोर्ट आणि सामाजिक सुरक्षा योजना लागू करण्यात याव्यात.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या वागणुकीमुळे जागतिक तणाव वाढला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक राजकारणात सध्या तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून त्यामागे मोठ्या प्रमाणावर Donald Trump यांच्या निर्णयशैलीचा आणि वक्तव्यांचा परिणाम दिसून येत आहे. त्यांच्या आक्रमक आणि विसंगत भूमिकेमुळे जगभरात अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे, अशी भावना अनेक स्तरांतून व्यक्त होत आहे.

अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यात वाढत चाललेला संघर्ष, तसेच पश्चिम आशियात निर्माण झालेली भीतीची परिस्थिती यामुळे तिसऱ्या महायुद्धाची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी केलेली काही वक्तव्ये आणि घेतलेले निर्णय यामुळे परिस्थिती आणखी चिघळल्याचे दिसते.

अमेरिकेतील एका रेडिओ भाष्यकाराच्या भारत आणि चीनविषयी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा संदर्भ देणारा ध्वनिचित्रफीत त्यांनी पुढे प्रसारित केल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर नाराजी व्यक्त झाली. भारतासारख्या देशाचा अवमान करणारे शब्दप्रयोग झाल्यानंतर त्यांनी स्पष्टीकरण देत भारत महान देश असल्याचे म्हटले; मात्र या बदलत्या भूमिकेमुळे त्यांच्या



**लेखक : रमेश कृ. लांजेवार (स्वतंत्र पत्रकार)**


विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शांतता चर्चेच्या प्रयत्नांदरम्यानही ट्रम्प यांनी इराणविरोधात कठोर भूमिका घेत धमक्यांचा सूर कायम ठेवला. परिणामी, शांतता चर्चेची दुसरी फेरी निष्फळ ठरल्याचे चित्र दिसते. एका बाजूला चर्चा आणि दुसऱ्या बाजूला युद्धसदृश तयारी, या परस्परविरोधी धोरणांमुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली आहे.

पश्चिम आशियात अमेरिकेने मोठ्या प्रमाणावर सैन्य तैनात केले असून युद्धनौकांची उपस्थिती वाढवली आहे. या हालचालींमुळे तणाव वाढण्याची शक्यता अधिक बळावली आहे. जागतिक व्यापारासाठी महत्त्वाची असलेली होर्मुझ सामुद्रधुनी सध्या संवेदनशील बनली असून, तेथील परिस्थितीचा परिणाम अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर होत आहे.

जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयमित आणि सुसंगत धोरण आवश्यक असताना, वारंवार बदलणारी भूमिका आणि कठोर वक्तव्ये यामुळे तणाव वाढत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंता व्यक्त केली जात आहे.

आजच्या घडीला जगाला स्थैर्य आणि समन्वयाची गरज आहे. अशा वेळी कोणत्याही महासत्तेच्या नेतृत्वाकडून जबाबदारीने वागण्याची अपेक्षा असते. अन्यथा, त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागू शकतात.






दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६






# निवृत्तीनंतरच्या जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची गरज – मीनोचर पटेल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

निवृत्ती ही सक्रिय जीवनाचा शेवट नसून आयुष्याकडे नव्याने पाहण्याची संधी आहे, असे मत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वक्ते, उद्योग प्रशिक्षणतज्ज्ञ व नेतृत्व मार्गदर्शक मीनोचर पटेल यांनी व्यक्त केले. डॉ. संजय रुणवाल लिखित 'गोल्डन रिटायरमेंट' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते.




हा कार्यक्रम भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेतील नवलमल फिरोदिया सभागृहात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीए रवी पंडित यांनी केले. यावेळी प्रतिभा रुणवाल व सारिका रुणवाल उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात व्यवसाय धोरण तज्ज्ञ अद्वैत कुरलेकर यांनी डॉ. रुणवाल यांच्याशी पुस्तकाविषयी संवाद साधला. याच वेळी डॉ. रुणवाल यांच्या संकेतस्थळाचे उद्‌घाटन करण्यात आले. या संकेतस्थळावर त्यांच्या सर्व पुस्तकांची माहिती तसेच विक्रीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मीनोचर पटेल यांनी परिपूर्ण जीवनासाठी आनंद निर्देशांक, भावनिक निर्देशांक, आरोग्य निर्देशांक, सामाजिक निर्देशांक आणि अध्यात्मिक निर्देशांक या पाच स्तंभांचे महत्त्व अधोरेखित केले. खरा आनंद बाह्य गोष्टींवर अवलंबून नसून स्वतःच्या भावनिक स्वावलंबनात आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. चांगले आरोग्य राखणे, नातेसंबंध जपणे आणि निःस्वार्थ सेवा यांमधून आयुष्य अधिक समृद्ध होते, असेही त्यांनी नमूद केले. जीवन आनंदी ठेवण्यासाठी संतुलन राखणे, नकारात्मकता सोडणे, अपेक्षा कमी ठेवणे आणि वास्तव स्वीकारणे हे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. संजय रुणवाल यांनी आपल्या पुस्तकात 'आसक्ती, अपेक्षा आणि इच्छा' या संकल्पनेचा उल्लेख करत सांगितले की, बहुतांश दुःखाचे मूळ या घटकांमध्ये आहे. निवृत्तीच्या टप्प्यावर यशाचे मोजमाप केवळ आर्थिक निकषांवर न करता अंतर्गत मूल्यांवर आधारित असावे, असे त्यांनी अधोरेखित केले. हे पुस्तक निवृत्तीला शेवट न मानता नव्या सुरुवातीचे नियोजन म्हणून मांडते. स्वतःची नव्याने ओळख, भावनिक लवचिकता, सर्वांगीण विकास आणि वारसा निर्माण यांसारख्या महत्त्वपूर्ण पैलूंवर पुस्तकात भर देण्यात आला आहे.

निवृत्तीला 'सुवर्ण पर्व' म्हणून स्वीकारून नव्या उर्जेने पुढे जाण्यासाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.




# 'नृत्यसमिधा'मधून गुरू प्रभा मराठे यांना मानवंदना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

घुंगरांचा तालबद्ध नाद... चेहऱ्यावरील उत्कट भावमुद्रा... कलात्मक व लयबद्ध अदाकारी... पारंपरिक वेशभूषेत कलाकारांनी साकारलेले भावविश्व... अशा मनोहारी नृत्याविष्काराची अनुभूती पुणेकरांनी घेतली. ताल, लय व भाव यांचा मोहक संगम असलेल्या 'नृत्यसमीधा'मधून नृत्यगुरू प्रभा मराठे यांना मानवंदना देण्यात आली. कथक नृत्यांगना वेदांती भागवत महाडिक यांच्या लयोम इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स, कलाछाया आणि कलाधाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गोखलेनगर येथील कलाछाया सांस्कृतिक केंद्रात आयोजित नृत्यमैफलीला रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. विविध नृत्यसंघांनी सादर केलेल्या रचनांमधून शास्त्रीय नृत्याच्या परंपरेचा समृद्ध वारसा उलगडला.



रश्मी जंगम पांडकर व त्यांच्या ताफ्याने सादर केलेल्या नृत्याविष्कारात लयबद्धता आणि भावपूर्णता यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला. मुल्ला अफसर खान व वेदांती भागवत महाडिक यांच्या नृत्यसंघांनीही विविध अंगांनी नृत्य साकारत प्रेक्षकांना भारावून टाकले. समूह नृत्यांमध्ये कलाकारांचा अचूक समन्वय, नेटक्या रचना आणि प्रभावी पदन्यास यामुळे प्रत्येक सादरीकरण उठून दिसले.

# रस्त्यांची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करा : मारुती वायाळ

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर तालुक्याच्या आदिवासी भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावीत अशी मागणी नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मारुती वायाळ यांनी केली आहे.



या बाबतचे निवेदन त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पुणे उत्तर)यांना दिले आहे. वायाळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात, १) जुन्नर ते आपटाळे,२) आपटाळे ते कुकडेश्वर ३) कुकडेश्वर ते घाटघर (नाणेघाट मार्ग) ह्या प्रमुख रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. स्थानिक नागरिक, विद्यार्थी, रुग्ण व शेतकरी वर्गाला यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, या प्रश्नाबाबत आपल्या विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांची अनेकदा प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना रस्त्याच्या कामाबाबत विनंती करण्यात आलेली आहे. मात्र यावर आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली दिसून येत नाही यामुळे आदिवासी समाजात नाराजीची भावना असून याबाबत खेद व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित सर्व प्रमुख रस्ते आदिवासी भागातील असूनही त्याकडे आवश्यक ते लक्ष दिले जात नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. ह्या रस्त्यांच्या दुरुस्ती/ बांधकामासाठी निविदा (टेंडर) प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती मिळत आहे. तरीदेखील प्रत्यक्षात कामे सुरू होत नसल्याने प्रशासनाची कार्यपद्धती व संबंधित ठेकेदारांची जबाबदारी याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. ठेकेदारांनी केलेल्या करारातील अटी व शर्तीप्रमाणे तात्काळ काम सुरू करून निश्चित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.

वरील सर्व रस्त्यांच्या कामांची तात्काळ पाहणी करून कामे सुरू करण्याचे आदेश द्यावेत. संबंधित ठेकेदारांना कडक सूचना देऊन विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करावी.कामात होत असलेल्या निष्काळजीपणाबाबत दोषींवर प्रशासकीय कारवाई करावी. अन्यथा सदर प्रकरणाबाबत उच्चस्तरीय कार्यालयांकडे तक्रार सादर करण्याचा इशारा देण्यात आला आहे.आदिवासी भागातील दळणवळणाच्या या गंभीर बाबीकडे तात्काळ लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही कराल अशी वायाळ यांनी व्यक्त केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### IDFC First Bankचा चौथ्या तिमाहीतील नफा वाढ

मुंबई (आरंभ पर्व) : IDFC First Bankने आर्थिक वर्ष २०२६ च्या चौथ्या तिमाहीसाठी आपले लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले असून, बँकेच्या नफ्यात वाढ नोंदविण्यात आली आहे. या तिमाहीत बँकेचा करानंतरचा नफा (पीएटी) ३१९ कोटी रुपयांवर पोहोचला असून त्यात ५ टक्के वाढ झाली आहे. अपवादात्मक घटकांचा परिणाम वगळता बँकेचा सामान्यीकृत पीएटी ७४६ कोटी रुपये इतका झाला असून, यामध्ये वर्षानुवर्ष तब्बल १४५ टक्क्यांची लक्षणीय वाढ दिसून येते. बँकेच्या संचालक मंडळाने ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसह संपूर्ण आर्थिक वर्षासाठीचे निकाल मंजूर केले. निकालांवर प्रतिक्रिया देताना बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी V. Vaidyanathan यांनी सांगितले की, बँकेची मालमत्ता गुणवत्ता स्थिर असून बहुतेक व्यवसायांमध्ये ती समाधानकारक आहे. त्यांनी नमूद केले की, मायक्रो-फायनान्स पोर्टफोलिओ वगळता इतर सर्व विभागांमध्ये चांगली कामगिरी दिसून येत आहे. आर्थिक वर्ष २५ आणि २६ दरम्यान मायक्रो-फायनान्स क्षेत्रात संपूर्ण उद्योगाला आव्हाने होती, मात्र आता हा प्रश्न मागे पडत असल्याचे संकेत आहेत. बँकेचे सकल अनुत्पादित मालमत्ता (जीएनपीए) प्रमाण १.६१ टक्के तर निव्वळ अनुत्पादित मालमत्ता (एनएनपीए) प्रमाण ०.४८ टक्क्यांवर आले असून, हे स्तर आरोग्यदायी मानले जात आहेत. चौथ्या तिमाहीत तरतुदी मागील दोन वर्षांतील सर्वात कमी स्तरावर म्हणजे कर्जांवर १.६३ टक्के आणि एकूण मालमत्तेच्या १.१८ टक्के इतक्या नोंदल्या गेल्या आहेत.

### नाविन्यपूर्ण संधी ओळखण्याची गरज

श्रीगोंदा (आरंभ पर्व) : आजच्या धकाधकीच्या जीवनात यशस्वी होण्यासाठी नाविन्यपूर्ण संधी ओळखण्याची क्षमता अत्यंत आवश्यक ठरते. तरुणाईच्या काळातच माणूस आपले भविष्य घडवत असतो. आजचा युवक हा देशाचा मुख्य आधारस्तंभ आहे; मात्र सध्या तो नोकरीच्या शोधात भरकटताना दिसतो. रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे काही तरुण व्यसनाधीनतेकडे वळताना दिसत आहेत, ही चिंतेची बाब आहे. युवकांना योग्य दिशा देणे आणि कष्टाचे महत्त्व पटवून देणे ही काळाची गरज आहे. आज अनेक तरुणांना झटपट श्रीमंत होण्याची घाई आहे. कमी कष्टात अधिक अपेक्षा ठेवण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. कोणतेही काम कमीपणाचे नसते, ही जाणीव तरुणांनी ठेवली पाहिजे. कष्टाला जवळ करून, नोकरीच्या मागे धावण्याऐवजी उद्योजकतेकडे वळणे आवश्यक आहे.

# माजी उपमहापौरांचा स्नेहमेळावा उत्साहात

- गीतसादरीकरणाने रंगली मैफल
- उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या संकल्पनेमुळे पहिल्यांदाच एकत्र आले माजी उपमहापौर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेला माजी उपमहापौरांचा स्नेहमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शहराच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा मेळावा संस्मरणीय ठरला. या कार्यक्रमाला माजी उपमहापौर डॉ. सतीश देसाई, आबा बागुल, बंडू गायकवाड, दीपक मानकर, प्रकाश मंत्री, प्रसन्न जगताप, सुनीता वाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विरोधी पक्षनेते नीलेश निकम, माजी नगरसेवक दत्ता सागरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) शहराध्यक्ष संजय सोनवणे, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्यासह अनेक मान्यवर आणि पत्रकारांनीही कार्यक्रमाला हजेरी लावली.

स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने सर्व माजी उपमहापौरांना एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधी मिळाली. राजकारणातील अनुभव, शहराच्या विकासासाठी केलेले प्रयत्न आणि भविष्यातील दृष्टीकोन यावर अनौपचारिक चर्चा रंगली. वातावरण मैत्रीपूर्ण आणि आनंददायी होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे माजी उपमहापौरांनी सादर केलेली गीते. परशुराम वाडेकर यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी विविध मराठी व हिंदी गीते सादर करत आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले. या संगीत मैफलीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले आणि कार्यक्रमाला वेगळेच रंगतदार स्वरूप प्राप्त झाले. संपूर्ण कार्यक्रमात एकोप्याचा, स्नेहाचा आणि सहकार्याचा संदेश देण्यात आला. अशा प्रकारचे स्नेहमेळावे भविष्यातही आयोजित करण्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

## ग्रामपंचायत मांडवगण फराटा ता. शिरूर, जि. पुणे

**बी-१ पेपर नोटीस क्रमांक -१ सन २०२६-२७**

ग्रामपंचायत मांडवगण फराटा ता.शिरूर,जि.पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदा पद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत मांडवगण फराटा ता.शिरूर,जि.पुणे यांच्याकडून दिनांक 27/04/2026 ते दिनांक 02/05/2026 या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक 27/04/2026 ते दिनांक 02/05/2026 रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने/ समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मागासवर्गीयांमध्ये हातपंप, वीजपंप आणि पाणीपुरवठा योजना आणि दुरुस्ती | 3,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 2. | जि.प. शाळांना व अंगणवाडी आर ओ फिल्टर तसेच दुरुस्ती | 1,50,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 3. | मागासवर्गीय वस्तीमध्ये नळ कनेक्शन जोडणी करणे | 3,79,163 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 4. | नळ पाणीपुरवठा योजना सोलर सुविधा पुरवणे | 6,94,713 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 5. | नळ पाणीपुरवठा योजना विस्तारीकरण / सुधारणा करणे | 5,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 6. | अजा वस्तीमध्ये नळ पाणीपुरवठा योजना विस्तारित करणे | 7,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 7. | विंधन विहीर / हातपंप घेणे व नपापु योजना करणे | 4,15,770 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 8. | अजा वस्तीमध्ये भूमिगत गटर बांधकाम व व्यवस्थापन करणे | 3,94,713 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 9. | जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी मध्ये स्वच्छता साधने व साहित्य खरेदी व स्वच्छता विषयक उपक्रम राबवणे | 5,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 10. | प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वच्छता विषयक सुधारणा करणे | 3,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 11. | वृक्ष लागवड | 1,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 12. | Z.P. शाळा शौचालय दुरुस्ती व बांधकाम | 5,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 13 | घन कचरा व्यवस्थापनासाठी घंटागाडी शेड उभारणे | 5,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 14. | गावातील पाणीपुरवठा वितरण व दुरुस्ती | 5,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 15. | नवीन पाणीपुरवठा योजना करणे | 6,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 16. | मागासवर्गीय वस्तीत पाणीपुरवठा योजना करणे | 6,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 17. | पाणीपुरवठा योजना देखभाल दुरुस्ती व हातपम्प घेणे | 5,94,713 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |
| 18. | पाणीपुरवठा योजना सोलरवर करणे | 6,00,000 | 27/04/2026 ते 02/05/2026 | 236/- | खुला २१८९ |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत मांडवगण फराटा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत मांडवगण फराटा यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामसेवक सरपंच**
**ग्रामपंचायत मांडवगण फराटा ता. शिरूर, जि. पुणे**

# २० शहरांतील तरुणाई उतरली रस्त्यावर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**





भारतातील दूध व्यवसाय हा बीफ (गोमांस) निर्यातीला थेट बळ देतो, हे सांगत पुण्यातील तरुणाई आज रस्त्यावर उतरली. 'पृथ्वी दिना'चे औचित्य साधून प्राणी हक्क कार्यकर्ते आज रस्त्यावर उतरले. अन् जगातील सर्वात मोठ्या दूध उत्पादक व्यवस्थेचे वास्तव नांगरिकां समोर मांडले. त्यांनी पुण्यातील जंगली महाराज रस्त्यावरील संभाजी उद्यानासमोर चित्रप्रदर्शन आणि निदर्शना द्वारे जनजागृती केली.

सध्या देशातील २० शहरांमध्ये हे युवक "दूध आणि मांस एकाच प्राण्याकडून येते" या वास्तवाकडे लक्ष वेधून घेत आहे. नागरिकांनी दुग्धव्यवसाय साखळीतून प्राण्यांचा प्रवास आणि शेवटी त्यांची मांस बाजारात होणारी विक्री यावर विचार करावा, असे आवाहन याद्वारे करण्यात आले. दुग्धव्यवसायामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या हानीवर विचार करण्यास देखील त्यांनी यावेळी भाग पाडले. भारतात एक लिटर दूध उत्पादनासाठी १०७८ लिटर पाणी लागते, जे आधीच पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या देशासाठी मोठे संकट आहे. तसेच, पशुधनातून होणारे मिथेन उत्सर्जन हे जागतिक तापमानवाढीचे प्रमुख कारण मानले जात आहे, याकडे देखील यावेळी लक्ष वेधण्यात आले.

पुण्यातील प्राणी हक्क आणि पर्यावरण कार्यकर्त्यांनी या मोहिमेदरम्यान आपली परखड मते मांडली. हर्षल मगरे (प्राणी हक्क कार्यकर्ते) म्हणाले, "भारताला आता या अस्वस्थ करणाऱ्या सत्याचा सामना करावाच लागेल की दुग्ध आणि गोमांस (बीफ) उद्योग या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश म्हणून, आपण गोमांस निर्यातीतही जगात आघाडीवर आहोत. कारण जेव्हा दुभती जनावरे 'अनुत्पादक' ठरतात, तेव्हा त्यांना अपरिहार्यपणे कत्तलखान्यात पाठवले जाते. आपण पित असलेला दुधाचा प्रत्येक घोट या कत्तलखान्यांना नकळतपणे आर्थिक पाठबळ देत असतो." ट्विंकल ओसवाल(प्राणी हक्क कार्यकर्ते) म्हणाले, "पुणे शहर सध्या भीषण पाणीटंचाई आणि उष्णतेच्या लाटेचा सामना करत आहे, तरीही आपण यामागच्या मुख्य कारणाकडे - म्हणजेच प्राणी आधारित शेती आणि दुग्ध व्यवसायाकडे - डोळेझाक करत आहोत. केवळ एक लिटर दुधासाठी हजारो लिटर पाणी वाया जात असेल, तर आपल्या आहाराच्या सवयी हा आता हवामान बदलाचा एक अतिशय गंभीर प्रश्न बनला आहे. जर आपल्याला पुण्याचे भविष्य सुरक्षित आणि हवामान-अनुकूल ठेवायचे असेल, तर दुग्धजन्य पदार्थांचा त्याग करणे हा आता केवळ एक पर्याय उरलेला नसून, ती पर्यावरणाची अत्यंत तातडीची गरज बनली आहे." प्रसाद सूर्यवंशी(प्राणी हक्क कार्यकर्ते) म्हणाले,"एक समाज म्हणून आपण दुधाच्या नावे चालणाऱ्या हिंसाचार आणि शोषणाच्या वास्तवापासून भयानक रित्या दुरावलो आहोत. आपण सांस्कृतिकदृष्ट्या या प्राण्यांची पूजा करतो, परंतु आपल्या दैनंदिन उपभोगाच्या सवयी नकळतपणे आणि निमूटपणे त्यांच्या आयुष्यभराच्या वेदनांना आणि शोषणाला निधी पुरवत आहेत. हा ७ फुटी देखावा आपल्या सामूहिक सद्सद्विवेकबुद्धीला दाखवलेला एक आरसा आहे, जो आपल्याला आपल्या कृती खऱ्या अर्थाने करुणेच्या मूल्यांशी जोडण्याचे आवाहन करतो."

## थोडक्यात पण महत्वाचे



### मॅरियट बोनवॉय आणि स्विगी यांच्यात धोरणात्मक भागीदारी

पुणे (आरंभ पर्व) : मॅरियट इंटरनॅशनलचा पुरस्कारप्राप्त ट्रॅव्हल प्रोग्राम मॅरियट बोनवॉय आणि भारतातील अग्रगण्य ऑन-डिमांड कन्व्हिनियन्स प्लॅटफॉर्म स्विगी यांनी एकत्रितपणे मॅरियट बोनवॉयचे फायदे भारतीय ग्राहकांच्या दैनंदिन जीवनात आणण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या धोरणात्मक भागीदारीतून हॉस्पिटॅलिटी आणि ऑन-डिमांड सुविधा क्षेत्रातील दोन विश्वासार्ह ब्रँड एकत्र आले असून, दोन्ही ब्रँडच्या सदस्यांना स्विगीच्या विविध सेवांद्वारे फूड डिलिव्हरीपासून क्विक कॉमर्स आणि डायनिंग आउटपर्यंत, मॅरियट बॉनवॉय पॉइंट्स कमावण्याची संधी मिळणार आहे. यामुळे मॅरियट बोनवॉयचे फायदे केवळ प्रवासापुरते मर्यादित न राहता दैनंदिन जीवनात सहजपणे उपलब्ध होतील.

### सुट्टीच्या हंगामामुळे रेल्वे गाड्या 'हाऊसफुल्ल'

पुणे (आरंभ पर्व) : शाळा, महाविद्यालयांना सुट्टी असल्यामुळे गावी जाणाऱ्या प्रवासीसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकावर गर्दी होत आहे. शिवाय प्रमुख गाड्यांचे तिकीट जूनपर्यंत फुल्ल झाले आहेत. परिणामी, ऐनवेळी सुट्टीच्या हंगामात प्रवासाचे बेत आखणाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे; परंतु उन्हाळ्यात रेल्वेला वाढणारी प्रवाशांची गर्दी विचारात घेऊन रेल्वे प्रशासनाकडून काही मार्गांवर विशेष गाड्या सोडण्यात आल्या आहेत. तरीही वाढत्या प्रवाशांमुळे रेल्वेगाड्यांसह स्थानक परिसरही 'हाऊसफुल्ल' झाला आहे. पुणे शहर हे उद्योग, शिक्षण तसेच ऐतिहासिक ठिकाण असल्याने येथे पर्यटकांची मोठी लगबग असते. बाहेरील राज्यातून कामानिमित्त व नोकरीसाठी पुण्यात ये-जा करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे पुणे स्थानकावरून दररोज किमान दीड ते दोन लाख नागरिक प्रवास करतात. परिणामी, एस. टी. बससह रेल्वे प्रवासाला अधिक प्राधान्य देण्यात येत असल्याने येथून तिरूपतीसह मुंबई, दिल्ली, दानापूर, कोलकाता, चेन्नई, गोरखपूर, आदी महत्त्वपूर्ण शहरांत रेल्वेसेवा सर्व प्रवाशांसाठी किफायतशीर आहे. सध्या बारावी, दहावीसह शाळांच्या परीक्षा संपल्या आहेत. त्यामुळे उन्हाळी सुट्टीत बाहेर फिरायला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. परिणामी रेल्वेस्थानकावर प्रचंड गर्दी होत आहे.







# फायर सेफ्टी व सिक्युरिटी क्षेत्रातून राष्ट्रनिर्मितीला चालना

## माजी राजदूत दीपक वोहरा यांचे मत; फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडियातर्फे चर्चासत्र

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आपला भारत देश तंत्रज्ञान, उद्योग, सुरक्षा, अवकाश संशोधन स्वतंत्र ओळख निर्माण करीत असून, सक्षम अर्थव्यवस्था म्ह्णून जागतिक स्तरावर स्थान बळकट करीत आहे. भारताची प्रतिमा एक सक्षम, विश्वासार्ह आणि वेगाने प्रगती करणारा देश अशी तयार होत आहे. फायर सेफ्टी आणि सिक्युरिटी क्षेत्रातील कामगिरीही याला अपवाद नाही. त्यातून राष्ट्रनिर्मितीला चालना देण्याचे काम होत आहे," असे प्रतिपादन भारताचे माजी राजदूत व परराष्ट्र सेवेतील निवृत्त अधिकारी दीपक वोहरा यांनी केले.



फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरच्या वतीने 'सुरक्षित भारत' या विषयावरील चर्चासत्रात दीपक वोहरा बोलत होते. वाकड येथील हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल येथे आयोजित या चर्चासत्र 'सुरक्षित भारत' घडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर, नियमांचे काटेकोर पालन आणि सर्व स्तरांवर जागरूकता वाढवण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. तसेच यावेळी 'एफएसएआय'च्या डायरीचे प्रकाशन करण्यात आले. वोहरा व पोटफोडे यांच्या हस्ते १२ मान्यवरांचा उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमावेळी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, एक्स बझ फायर अँड सिक्युरिटीचे संचालक चिंटू आशेर, 'एफएसएआय' पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सुजल शहा, सचिव सागर मुनीश्वर, सिम्पल जैन, प्रदेश संचालक वरुण तिवारी, संयोजक केदार देशमुख, शिवम फायरवाला, विनायक जोगळेकर, अजित यादव, अमोल उंबरजे, ऋतुराज कुलकर्णी, सागर कुलकर्णी यांच्यासह उद्योग, बांधकाम आणि सुरक्षा क्षेत्रातील तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दीपक वोहरा यांनी भारत आणि इतर देशांमधील संबंधांवर, भारताच्या क्षमतेवर विचार मांडले.

चिंटू आशेर यांनी बदलत्या व्यावसायिक वातावरणातील आव्हानांवर भाष्य केले. बाजारातील अनिश्चितता आणि तांत्रिक बदल लक्षात घेता उद्योजकांनी 'प्रॉब्लेम सॉल्व्हर' बनणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अडचणी या संधींमध्ये रूपांतरित करून सातत्याने नवकल्पना स्वीकारणे हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष चर्चासत्रामध्ये गणेश जाधव, देवेंद्र पोटफोडे, शैलेश धनाने, सुभाष खानडे, नरेंद्र दिवेदी यांनी सहभाग घेतला. सुजल शहा यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. सागर मुनीश्वर यांनी आभार मानले.


आज भारत स्वयंपूर्णतेकडे जात असून, सुरक्षा क्षेत्रातही मोठी प्रगती करत आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करून सुरक्षित भारतासाठी विविध उपाययोजना करण्यावर आपले लोक काम करताहेत, याचे समाधान वाटत असल्याचे वोहरा म्हणाले. फायर सेफ्टी आणि सिक्युरिटी क्षेत्रातील कंपन्या अत्याधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून भारताला आत्मनिर्भर बनवण्यास हातभार लावत आहेत.

देवेंद्र पोटफोडे म्हणाले, "आधुनिक बांधकाम क्षेत्रात आकर्षक रचना, उंच इमारती आणि काचेच्या संरचनांचा वापर वाढत आहे. मात्र, लक्षवेधक बांधकाम करण्याच्या प्रयत्नात सुरक्षेच्या बाबतीत तडजोड होऊ नये. आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजनांची तरतूद बांधकाम करताना व्हायला हवी. सेफ्टी सर्टिफिकेशन केवळ औपचारिकता न राहता त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे."

## Medtronic कडून पार्किन्सनग्रस्तांसाठी प्रगत मेंदू उद्दीपन प्रणालीचे सादरीकरण

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

Medtronic या आरोग्यसेवा तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीने भारतात पार्किन्सन आजाराने ग्रस्त रुग्णांसाठी प्रगत मेंदू उद्दीपन प्रणालीचे सादरीकरण केले आहे. ही प्रणाली विद्यमान उपचार पद्धतीतील एक महत्त्वपूर्ण सुधारणा मानली जात असून रुग्णांचे जीवनमान उंचावण्यावर याचा भर आहे.



पार्किन्सन हा मज्जासंस्थेशी संबंधित प्रगत आजार असून तो व्यक्तीच्या हालचालींवर आणि दैनंदिन जीवनावर परिणाम करतो. काळानुसार चालणे, लिहिणे किंवा वस्तू पकडणे यांसारख्या कृती कठीण होत जातात. याशिवाय संवाद, झोप आणि एकूण आरोग्यावरही या आजाराचा परिणाम दिसून येतो.

सध्या उपलब्ध मेंदू उद्दीपन उपचार पद्धतीमध्ये दिवसभरात उद्दीपनाची पातळी हाताने बदलावी लागते. मात्र नव्या प्रणालीमध्ये रुग्णाच्या प्रकृतीनुसार आणि मेंदूतील संकेतांनुसार आपोआप बदल होतात. त्यामुळे लक्षणांवर अधिक सातत्यपूर्ण नियंत्रण मिळते, दुष्परिणाम कमी होतात आणि यंत्रणेतील ऊर्जेचा वापर अधिक कार्यक्षम होतो.

या प्रणालीमध्ये मेंदूतील संकेत ओळखणारे प्रगत तंत्रज्ञान वापरण्यात आले असून त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त झाली आहे. मेंदूतील हालचालींवर नियंत्रण ठेवणाऱ्या भागाला सूक्ष्म विद्युत संकेत पाठवून लक्षणे कमी करण्याचे काम ही यंत्रणा करते.

भारतात पार्किन्सनग्रस्त रुग्णांची संख्या वाढत असून आगामी काळात ती मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा वेळी या प्रगत उपचार प्रणालीचे सादरीकरण अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. जरी या आजारावर संपूर्ण उपचार उपलब्ध नसले तरी मेंदू उद्दीपन उपचार पद्धतीमुळे गेल्या अनेक वर्षांत रुग्णांच्या जीवनात लक्षणीय सुधारणा झाली आहे.

# ASUS कडून 'एक्स्पर्टबुक अल्ट्रा' सादर

## व्यावसायिक संगणक मालिकेचा मोठा विस्तार

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

ASUS या तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीने व्यावसायिक वापरासाठी 'एक्स्पर्टबुक अल्ट्रा' हा नवीन संगणक सादर केला असून 'एक्स्पर्टबुक पी' मालिकेचा विस्तार करत 'पी३' आणि 'पी५' ही नवी रूपेही बाजारात आणली आहेत. कंपनीच्या माहितीनुसार, 'एक्स्पर्टबुक अल्ट्रा' हा अत्यंत हलका, उच्च कार्यक्षमतेचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने काम करणारा संगणक आहे. वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग क्षेत्रातील वापरकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन याची रचना करण्यात आली आहे. आकर्षक पडदा, प्रभावी ध्वनी व्यवस्था, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि उच्च दर्जाची सुरक्षितता ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.




हा संगणक विशेष धातू मिश्रणापासून तयार करण्यात आला असून तो हलका आणि मजबूत आहे. सुमारे एक किलोपेक्षा कमी वजन, वेगवान प्रक्रिया क्षमता, जलद स्मरणक्षमता आणि मोठी साठवण क्षमता यामुळे तो अधिक सक्षम ठरतो. यामध्ये उच्च दर्जाचा दृश्य अनुभव देणारा पडदा आणि उत्कृष्ट ध्वनी प्रणाली देण्यात आली आहे. या संगणकात सुरक्षिततेवर विशेष भर देण्यात आला असून बहुपातळी संरक्षण व्यवस्था उपलब्ध आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील माहिती सुरक्षित राहण्यास मदत होते.

'एक्स्पर्टबुक पी' मालिकेतील 'पी३' आणि 'पी५' ही रूपे विविध उद्योगांसाठी उपयुक्त ठरणार आहेत. या संगणकांमध्ये उच्च कार्यक्षमता, वाढवता येणारी क्षमता आणि विविध पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे वाढत्या उद्योगांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ते उपयुक्त ठरतील.

या सर्व संगणकांमध्ये टिकाऊपणा, सुरक्षितता, सुलभ जोडणी आणि सहज वाहून नेता येण्याची सोय यांचा समतोल राखण्यात आला आहे. देशभर उपलब्ध सेवा जाळ्याच्या माध्यमातून वापरकर्त्यांना सहाय्य देण्याची सोय करण्यात आली आहे.

### उपलब्धता व किंमत

'एक्स्पर्टबुक अल्ट्रा' हा संगणक सुमारे दोन लाख एकोणचाळीस हजार नऊशे नव्वद रुपयांच्या प्रारंभिक किमतीत उपलब्ध होणार आहे. 'पी३' मालिका सुमारे पंच्याण्णव हजार रुपयांपासून सुरू होत असून 'पी५' मालिका लवकरच सुमारे दोन लाख चौदा हजार रुपयांच्या प्रारंभिक किमतीत उपलब्ध होईल. नव्या उत्पादनांच्या निमित्ताने ग्राहकांना मर्यादित कालावधीसाठी विस्तारित हमी, बॅटरी संरक्षण, अपघाती नुकसान संरक्षण तसेच इतर सवलती देण्यात येणार असल्याचे कंपनीने जाहीर केले आहे.

या निमित्ताने कंपनीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी सॅमसन हू यांनी सांगितले की, बदलत्या व्यावसायिक गरजा लक्षात घेऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कामकाज अधिक परिणामकारक करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. तसेच Intel या संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेचे वरिष्ठ अधिकारी पी. पी. सुनील आचार्य यांनी सांगितले की, या नव्या संगणकांमुळे व्यावसायिकांना अधिक वेगवान आणि सक्षम साधन उपलब्ध होईल.

# शहराच्या जडणघडणीत 'बीएआय'सारख्या संस्थांचे योगदान

## नवलकिशोर राम यांचे मत; बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ

### बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया पुणे सेंटरच्या अध्यक्षपदी अजय गुजर यांची फेरनिवड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"पुण्याची ओळख 'पेन्शनर्स पॅराडाईज' अशी असली, तरी संस्कृती, इतिहास आणि स्वातंत्र्य चळवळीतील योगदानामुळे या शहराने स्वतंत्र वैशिष्ट्य जपले आहे. नियोजनबद्ध विकास, रिअल इस्टेट क्षेत्रातील वाढ आणि उद्योगांच्या विस्तारामुळे आज पुणे आयटी, शिक्षण, वैद्यकीय आणि स्टार्टअप क्षेत्राचे प्रमुख केंद्र बनले आहे. शहराच्या या जडणघडणीत बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) यांसारख्या संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे," असे प्रतिपादन पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम यांनी केले.




बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) पुणे सेंटरच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या पदग्रहण समारंभात नवलकिशोर राम बोलत होते. हॉटेल ग्रँड शेरेटोन येथे आयोजित समारंभात अतिरिक्त कामगार आयुक्त बाळासाहेब वाघ, बीएआय महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रकाश मेंडा, बीएआय पुणे सेंटरचे अध्यक्ष अजय गुजर, उपाध्यक्ष राजाराम हजारे, सचिव डॉ. महेश राठी, खजिनदार सुशील अग्रवाल, मावळते उपाध्यक्ष महेश मायदेव, सचिव सी. एच. रतलानी, सुनील मते आदी उपस्थित होते. अध्यक्षपदी अजय गुजर यांची फेरनिवड करण्यात आली आहे.

नवलकिशोर राम म्हणाले, "पुणे शहराने संतुलित विकासाचा आदर्श ठेवला आहे. आयटी, शिक्षण, वैद्यकीय सेवा, कला आणि परवडणारी घरे तसेच व्यावसायिक जागा यामुळे शहराचा वेगाने विस्तार होत आहे. देशातील सुमारे ५०० 'जीसीसी' पुण्यात कार्यरत असून, स्टार्टअपसाठीही हे शहर आकर्षणाचे केंद्र बनले आहे. शहरातील विकासाला गती मिळाली असली, तरी नियोजन आणि अंमलबजावणी यामध्ये काम करण्याची गरज आहे. झोपडपट्ट्यांचे वाढते प्रमाण, वाहतूक कोंडी, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील मर्यादा आणि नागरिकांशी संवादाचा अभाव या आव्हानांवर काम करावे लागेल. शाश्वत विकासासाठी सर्व घटकांनी एकत्र यावे. विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे, सक्षम इकोसिस्टम आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी देणे गरजेचे आहे. मेट्रो प्रकल्प सुरू झाला असला, तरी स्थानिक कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासह 'पीएमपीएमएल'चा प्रभावी वापर व्हावा."

दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची संधी मिळाल्याचा आनंद व्यक्त करत अजय गुजर म्हणाले, "असोसिएशनच्या कार्यालयाचे नूतनीकरण, बांधकाम क्षेत्रातील सर्व उत्पादक, साहित्य आणि तंत्रज्ञान याचे भव्य प्रदर्शन, राष्ट्रीय स्तरावरील 'बीएआय' सदस्यांचे अधिवेशन घेणार आहोत. बांधकाम क्षेत्रातील समस्यांवर चर्चा करून त्यावर ठोस उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जाईल. साईट व्हिजिट्स, तांत्रिक चर्चासत्रे आणि नवीन मशिनरी व तंत्रज्ञानाविषयी ज्ञानवृद्धीवर भर दिला जाईल. शासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून बांधकाम क्षेत्रातील प्रश्न सोडवण्यासह कामगारांच्या मुलांना प्रोत्साहन, 'वेल बिल्ट स्ट्रक्चर' स्पर्धा तसेच ग्रामीण भागात मुलींसाठी स्वच्छतागृह उभारणीसारखे उपक्रम हाती घेणार आहोत."

बाळासाहेब वाघ म्हणाले, "कामगारांच्या कल्याणासाठी कामगार आयुक्तालय आहे. कामगार व त्यांच्या मुलांसाठी शिक्षण, आरोग्य व विमा आदी योजना आहेत. बिल्डर आणि कामगार आयुक्तालय यांच्यातील समन्वय वाढला, तर कामगारांना त्याचा लाभ चांगल्या पद्धतीने होईल. एकमेकांना पूरक भूमिकेतून काम केले, तर कामगार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे अधिक सोयीचे होईल. बिल्डर्स असोसिएशनने यामध्ये पुढाकार घ्यावा."

नियामक मंडळातील रणजित मोरे, जगन्नाथ जाधव, डॉ. आर. बी. कृष्णानी यांचा, तसेच वर्षभरात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. प्रकाश मेंडा यांनीही मनोगत व्यक्त केले. संजय आपटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. महेश राठी यांनी आभार मानले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.